## प्रेसनोट

## रोजगार मेळावा. पुणे दि.१७/११/२०१६.

पुणे पोलीस आयुक्तालय, पुणे शहर व जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,४८१ रास्ता पेठ पुणे -११ यांच्या संयुक्त विदयमाने रविवार,दि.२०/११/२०१६ रोजी सकाळी १०.०० वा. रोजगार मेळाव्याचे आयोजन शिवाजीनगर पोलीस मुख्यालय,पोलीस ग्राउंड शिवाजीनगर पुणे – ५ येथे करण्यात आलेले आहे.

सदर रोजगार मेळाव्यात पुणे जिल्हयातील पुणे शहर,भोसरी,चाकण या औद्योगिक परिसरातील एकुण ३१ उदयोजकांनी सहभाग दर्शविलेला असुन त्यांच्या कडुन एकुण ३४०६ रिक्त पदे भरणार आहेत.

पुणे शहर,पुणे ग्रामीण,पुणे रेल्वे,राज्य राखीव पोलीस बल गट क्रं.१ व २,तसेच पूणे जिल्हयातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे पाल्य यांच्या उमेदवारासाठी ज्यांची शैक्षणिक पात्रता किमान १० वी,१२ वी, पदवीधर,आयटीआय, डिप्लोमा,बीई, बीबीए, ड्रायव्हर्स इत्यादी पात्रता धारण केलेल्या उमेदवारांनी रविवार दि.२०/११/२०१६ रोजी शिवाजीनगर पोलीस मुख्यालय,पोलीस ग्राउंड शिवाजीनगर पुणे – ५ या ठिकाणी आपले शैक्षणिक मूळ कागदपत्रांसह प्रत्यक्ष मुलाखतीस उपस्थित राहवे.

प्रत्येक उमेदवाराने यासंधीचा ~~फायदा~~ लाभ ~~घेण्यात~~ घ्यावा.तसेच सहभाग घेणा-या प्रत्येक उमेदवाराने www.maharojgar.gov.in या वेबसाईउवर जावुन उदयोजकांची मागणी पाहुन आपली ऑनलाईन संमत्ती नोंदवावी. या बाबत काही अडचण आल्यास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,४८१ रास्ता पेठ पुणे -११ या कार्यालयाचा दुरध्वनी क्रं.०२० - २६१३३६०६ वर श्री.तु.गं.डगळे,श्री.वि.शा. दळवी यांच्याशी संपर्क साधावा.असे आवाहान सहायक संचालक श्री.गं.अ.सांगडे यांनी केलेले आहे.

एवढया मोठया प्रमाणात रोजगार मेळाव्याचे प्रथमच पुणे पोलीस आयुक्तालय पुणे शहर यांचे वतीने आयोजन करण्यात आलेले आहे.

सदर मेळाव्याचे उदघाटन श्रीमती रश्मि शुक्ला, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे हस्ते रविवार दि.२०/११/२०१६ रोजी पोलीस मुख्यालय शिवाजीनगर पोलीस ग्राउंड पुणे शहर येथे होणार असुन सदर कार्यक्रमास श्री.सुनिल रामानंद,सह पोलीस आयुक्त,पुणे शहर, सहायक संचालक श्री.गं.अ.सांगडे व श्री.दिलीप पवार, उप संचालक, जिल्हा कौशल्य विकास, पुणे विभाग, श्री.शशिकांत शिंदे, अपर पोलीस आयुक्त, प्रशासन, पुणे शहर, श्री. अरविंद चावरिया, पोलीस उप आयुक्त,मुख्यालय -१ पुणे शहर श्री.जी.एस.माडगूळकर ,सहाय्यक पोलीस आयुक्त, मानवी संसाधन विभाग पोलीस,मुख्यालय, पुणे यांचे उपस्थितीत होणार आहे.